१.	जगद्विख्यात नाटककार शेक्सपीअर व त्याची नाटके (रोमिओ अँड ज्यूलिएट) ले. गो. वा. बापट	रंग. व.३, अं.१२, जुलै १९१०, पृष्ठ १ ते १६ रंग. व.४, अं.३, मार्च १९११, पृष्ठ १७ ते ३२
२.	टू जंटलमेन ऑफ व्हेरोना, गो. वा. बापट	व.५. अं.१, मे १९१२, पृष्ठ ३३ ते ४४
३.	सिंबेलाइन् गो. वा. बापट	व.५, अं.४, ऑक्टो. १९१२, पृष्ठ ४५ ते ५२ व.५, अं.५/६, डिसेंबर १९१२, पृष्ठ ५३ ते ५६ व.५, अं.७, जून १९१३, पृष्ठ ५३ ते ६०
४.	मिड्समर नाईटस् डीम्म, पु. रा. लेले, (मधुयामिनी स्वप्न)	व.४, अं.६, जून १९११ पृष्ठ १ ते १६ व.४, अं. ७/८/९ जुलै ते ऑक्टो १९११, पृष्ठ १७ ते २४
५.	शेक्सपीअरची शोकरसपूर्ण नाटके, ले. रामकृष्ण वासुदेव बर्वे (नाट्यविषयक चर्चा)	व.२, अं.२, सप्टें. १९०८, पृष्ठ २५ ते ३८

जगद्विख्यात नाटककार शेक्सपीअर व त्याची नाटके या आपल्या लेखात रा. सा. गोपाळ वामन बापट यांनी रोमिओ आणि ज्यूलिएट या नाटकाचा एका विशिष्ट अंगाने परामर्ष घेतला आहे.

लेखाच्या सुरुवातीला लेखकाने शेक्सपीअरचे अल्प चरित्र सांगितले आहे त्याच्या कलाकृतीचा आपल्याला परिचय झालेला आहे इतकेच नव्हे तर त्याच्या नाटकांविषयी पाश्चात्य टीकाकारांची मते काय आहेत आणि ती किती परस्परविरोधी आहेत हेही

आपल्याला माहीत आहे असे सांगून रायमर, व्हॉलटेअर, पोप या टीकाकारांची मते उद्धृत केली आहेत. त्यावरून शेक्सपीअरवर किती विरुद्ध टोकाची टीका झाली याचे दर्शन घडते.

रायमर म्हणतो, ' His brains are turned, he raves and rambles without any coherence any spark of reason or any rule to control him or set bounds to his frenzy (त्याचे डोके फिरले आहे व तो अनियंत्रितपणे बकत जातो.) In the neighing of a horse or in the growling of a mastiff there is a meaning there is as lively an expression, nay, I say more humanity than many times in the tragical fights of Shakespeare . (दु:खोद्गाराच्या ज्या भराऱ्या तो मारतो त्यांच्यात जो अर्थ व मनुष्यपणा असतो त्यापेक्षा अधिक अर्थ व मनुष्यपण घोड्याच्या खिंकाळण्यात व कुत्र्याच्या गुरगुरण्यात असतात.)

व्हॉलटेअर म्हणतो Shakespeare is a writer of monstrous faces व त्याची कविता is the fruit of imagination of an introyicated savage (त्याची नाटके राक्षसी फार्स आहेत व त्याची कविता मद्यपीचे बरळणे होय)

श्री. बापट लिहितात, शेक्सपीअरविषयीची ही मतांची पहिली लाट होती. त्यानंतरच्या टप्प्यात त्याच्या विषयीच्या सहानुभूतीची लाट आली पोप म्हणतो – ' Shakespeare was dependent for his subsistence on pleasing the taste of tradesmen and mechanics and that his wrong chice of subjects and wrong conduct of incidents, his false thoughts and forced expressions are the result of his being forced to please the lowest of people and keep the worst company."

पोटाकरिता शेक्सपीअरला हलक्या लोकांशी संबंध ठेवावा लागला, त्यामुळे नाटकाकरिता चुकीचे विषय घेतले व रचना व उद्गारही चुकीचेच घातले गेले.

अशाप्रकारे उलटसुलट टीका होत होत शेक्सपीअरशी पूर्ण समरस झालेले टीकाकार निर्माण झाले त्यांनी त्याची खरी योग्यता प्रस्थापित केली, अशाप्रकारची टोकाची मते वाचून शेक्सपीअरच्या योग्यतेविषयी शंका निर्माण होण्याचा संभव आहे, कारण आमची व शेक्सपीअरच्या कृतींची अजूनपर्यंत दाट ओळख झालेली नाही. अशा स्थितीत कोणतेच मत गाठी बांधून घेऊ नये हेच चांगले.

‘ शेक्सपीअर, कालिदास, भवभूती या असाधारण कोटीतील विभूती आहेत. शेक्सपीअर हा आम्हांस गुरुस्थानी आहे. म्हणूनच त्याच्याजवळ बसून मी काय शिकलो ते विचार मांडावेत असा आपला नम्र हेतू श्री. बापट यांनी व्यक्त केला आहे.

शेक्सपीअरवर लिहिण्यात अनेक अडचणी आहेत असे सांगून त्यातील महत्त्वाची अडचण म्हणजे युरोपिअन पंडितांनी त्याच्यावर भारेच्या भारे पुस्तके लिहून ठेवलेली आहेत. ही संख्येने प्रचंड अशी पुस्तके मिळणे, ती वाचून होणे आणि त्यातील विचार वाचकांना समजण्यासारखे मांडता येणे या अडचणी आहेत. शेक्सपीअरच्या कृतींशी अजून वाचकांची चांगलीशी ओळख झालेली नाही. या परिस्थितीत स्वत:च विवेचनाची दृष्टी आणि दिशा ठरवून घेऊन लिहावे असा हेतू लेखकाने स्पष्ट केला आहे.

विकारांची अनंत रूपे ओळखून ती आपल्या कृतीत निर्माण करण्याबद्दल शेक्सपीअरची ख्याती आहे. त्याच्या प्रत्येक नाटकावर त्या त्या नाटकात दिसणाऱ्या विवक्षित विकाराच्या स्वरूपाविषयी, संविधानकरचना व पात्रांचे शील या दोन सदरांखाली विद्वान टीकाकारांनी टीका केल्या आहेत पण एकच विकार घेऊन त्या विकाराची वेगवेगळी रूपे वेगवेगळ्या नाटकात कशी दाखविली आहेत, या विषयाचा व्यवस्थितविचार कोणी केल्याचे पाहण्यात नाही.म्हणून शेक्सपीअरच्या नाटकातील स्त्रीपुरुषप्रेम या विकारावर लक्ष केंद्रित करून विवेचन केले आहे. या लेखात प्रत्येक नाटकाचा, त्याचे संविधानक, पात्रांचे शील, त्यातील रस, त्याचा शेवट इ. बद्दल ठराविक पद्धतीने अनुक्रमवार विचार करण्यात येणार नाही हे श्री. बापट यांनी स्पष्ट केले आहे.

मुख्य विषयाला प्रारंभ करण्यापूर्वीचे श्री. बापट यांचे विवेचन येथे विस्ताराने मुद्दाम दिले कारण त्यातूनच त्यांच्या लेखनाची मूळ बैठक कळते. त्यातील नेमके सूत्र, त्यांनी घालून घेतलेली मर्यादा समजते. त्यांनी हाती घेतलेल्या अभ्यासविषयाचा आलोक त्यांच्या दृष्टिपथात आहे. त्यातून त्यांना नेमके काय मांडावयाचे आहे ते त्यांच्या मनात स्पष्ट आहे. हाती घेतलेल्या विषयावर पूर्वी झालेल्या अभ्यासाचे दडपण येऊ न देता, नवीन अभ्यासक्षेत्र त्यांनी सूक्ष्म बुद्धीने, सखोल व्यासंगाने शोधून काढूले आहे आणि त्याबाबतचे नेमके विचार त्यांना मांडावयाचे आहेत. श्री. बापट यांची ही अभ्यासपद्धती, चिंतनशीलता अभ्यासकांना मार्गदर्शक ठरण्यासारखी आहे.

स्त्रीपुरुषप्रेम - रोमिओ अँड ज्यूलिएट -

शेक्सपीअरच्या बहुतेक सर्व नाटकात स्त्रीपुरुषप्रेम हा विषय असतो आणि त्याचे चित्रण करताना त्याने असा समाज निवडला आहे की ज्या समाजात मुलामुलींचे विवाह त्यांचे मातापिता ठरवीत असत.

दुसरी गोष्ट म्हणजे हे प्रेम सकृद्दर्शनोद्गम (Love at first sight) स्वरूपाचे आहे आणि या प्रेमाच्या उद्‌गमापासून तो ईप्सित साध्ये होईपर्यंतचा काळच त्याने नाटकाचा काळ केला आहे. अशा प्रकारच्या शेक्सपीअरच्या नाटकात रोमिओ अँड ज्यूलिएट हे नाटक प्रमुख आहे

या नाटकाचे, या लेखाच्या पूर्वी (नजिकच्या काळात) प्रसिद्ध झालेले भाषांतर म्हणजे श्री. बेलसरे यांनी केलेले भाषांतर हे होते आणि त्याचे प्रयोगही झालेले होते. पण तरीही वाचकांच्या माहितीसाठी या नाटकाचे संविधानक संक्षिप्त रूपाने श्री. बापट यांनी दिले आहे.

श्री. बापट यांनी, बेलसरे यांच्या, प्रस्तावनेत व्यक्त झालेल्या काही विचारांबाबत मतभिन्नता दर्शविली आहे. बेलसरे आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, ‘‘ रोमिओचे व ज्यूलिएटचे प्रेम अविनाभावाचे आहे; म्हणजे मी तुला व तू मला अशाच प्रकारचे आहे. ’’ श्री. बापट म्हणतात रोमिओचे प्रेम अशा प्रकारचे नव्हते. कवीने रोमिओची भूमिका अशा प्रकारची कल्पिलेली नाही. बेलसरे यांनी भवभूतीच्या मालतीमाधव नाटकातील अंक ६ श्लोक १८ उद्‌धृत केला आहे.

‘ प्रेयो मित्रं बन्धुता वा समग्रा ’ इ. पतिपत्नींनी एकमेकांना जीवितसर्वस्व मानावे असे कामन्दकीने म्हटले आहे. श्री. बापट म्हणतात, ज्यावेळेस रोमिओच्या नजरेस ज्यूलिएट पडली त्यावेळी माधवाप्रमाणे त्याची स्थिती नव्हती. माधवाच्या नजरेस मालती पडली तेव्हा त्याचे मन अगदी मोकळे होते. कारण ते पूर्वी दुसऱ्या ठिकाणी अडकले गेले नव्हते. उलट

रोमिओचे मन दुसऱ्या कुमारिकेकडे होते, इतकेच नाही तर ते तेथे मजबूत बसले होते, खिळले होते. त्याच्या मन:स्थितीचे, त्याच्या बापाने केलेले वर्णन असे आहे -

‘ Many a morning hath he there been seen
With tears augmenting the fresh mornings dew
Adding to clouds more clouds with his deep sigh----

’अशारीतीने ज्याचे मन आधीच एका मुलीवर गेले आहे. त्या रोमिओला, ज्यूलिएटला पाहिल्याबरोबर तिच्याबद्दल प्रेम वाटते. अर्थात हे प्रेम शुद्ध प्रेम नव्हे. रोमिओ व रोझालिनच्या पूर्वप्रेमाचा भाग जर या नाटकात नसता तर, रोमिओचे मन जर मोकळे असते तर या नाटकातील प्रेमाचे स्वरूप शुद्ध आहे असे म्हणता आले असते. पूर्वप्रेमाचा हा भाग दाखविल्याने नाटकातील कोणत्याच भागाचे पोषण होत नाही आणि वगळल्याने हानी होत नाही. तरीही हा भाग शेक्सपीअरने घातला आहे त्याअर्थी या नाटकात प्रेमाचे एक प्रकारचे अशुद्ध स्वरूप दाखविणे हा त्याचा हेतू आहे व तो हेतू स्पष्ट दाखविण्याचाही प्रयत्न केला आहे. रोमिओ, रोझालिन्संबंधी बेनव्होलिओला - आपल्या मित्राला म्हणतो -

‘ O! She is rich in beauty; only Poor
That when She dies, with beauty dies her store ’

आणि ज्यूलिएट दृष्टीस पडल्याबरोबर तिच्याबद्दल रोमिओ म्हणतो -

‘O! She both teach the torches to burn bright-
Beauty too rich for use, for earth too dear!
So shows a snowy dove trooping with crows
As yonder lady over her fellows shows.

बेनव्होलिओ पूर्वी रोमिओला म्हणालेला असतो-

‘ And I will make thee think thy swan a crow ’ते खरे ठरते. ज्यूलिएटला पाहिल्याबरोबर रोमिओच्या दृष्टीने ज्यूलिएट राजहंसी आणि रोझालिन् कावळा ठरलीङ्ग!

म्हणजेच रोमिओचे प्रेम शुद्ध नव्हते. सौंदर्य व प्रेम यांची त्याच्या ठिकाणी समव्याप्ती होती. असे मत श्री. बापट यांनी व्यक्त केले आहे. रोमिओसारखा भ्रमर वृत्तीचा नायक शेक्सपीअरने मुद्दाम निवडलेला आहे असे सांगून श्री. बापट यांनी त्यांच्या ‘ङ्गनाटकविषयक व्यापक विचारङ्ग’ या निबंधातील विवेचनाचे स्मरण दिले आहे. या निबंधात त्यांनी नायक उदात्त व सर्वतोपरी सद्‌गुणी असला पाहिजे हा समज चुकीचा आहे असे मत व्यक्त केले आहे. याबाबत दुष्यंताचे उदाहरण दिले आहे. शेक्सपीअरचा रोमिओ हेही त्यांच्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ दुसरे उदाहरण येथे दिले आलहे. श्री. बापट यांचे मत असे आहे की खऱ्या बुद्धिमान नाटककाराचे हेच काम आहे की जितक्या प्रकारची खरी, खोटी नाणी जगात दिसतात व असतात, ती त्यांच्या खऱ्या स्वरूपातच, त्यांचा बद्द नाद न छपविता आपल्या नाटकात दाखवावीत. रोमिओ हे एक खरे नाणे नसून काहीसे बद्द नाणे आहे.

नाटकाच्या नायकासंबंधीच्या सांकेतिक कल्पनेच्या चाकोरीबाहेरचा हा विचार आहे. संस्कृत नाट्यशास्त्रातील नियमांनुसार नाटकाचा नायक हा उदात्त, धीरगंभीर, धीरललित असा असावा ही कल्पना भारतीय मनात रुजलेली होती. पाश्चात्य नाटके आणि नाट्यसमीक्षा यांच्या अभ्यासाने आपल्या विद्वानांची नाट्यदृष्टी कशी व्यापक बनत गेली, ते येथे लक्षात येते. नाटकातील जीवनदर्शन वास्तव, सूक्ष्म आणि विशाल असावे हा विचार जीवनदृष्टी आणि नाट्यदृष्टी सखोल बनली असल्याचे दर्शक आहे.

अशुद्ध प्रेमाचे स्वरूप दाखविणे हा नाटकाचा विषय आहे हे मत प्रस्थापित केल्यावर श्री. बापट यांनी रोमिओबाबत एक प्रश्न उपस्थित करून त्याच्या व्यक्तिरेखेचे विश्लेषण आणि शेक्सपीअरचे, व्यक्तिरेखाटनाचे कौशल्य यांची चर्चा केली आहे. या लेखात त्यांना जो विचार मांडावयाचा आहे त्या अनुरोधाने त्यांनी रोमिओचे व्यक्तिमत्त्व उलगडून दाखविले आहे.

श्री. बापट म्हणतात, रोमिओ हे एक खरे नाणे नसून बद्द नाणे आहे म्हणणे जर खरे आहे तर असा रोमिओ आपल्या मृत पत्नीसाठी स्वत: जीव देणे कसे शक्य आहे ? या प्रश्नाचे उत्तर देणे म्हणजेच शेक्सपीअरचे कौशल्य दाखविणे. ज्यूलिएट मरण पावली हे पाहून रोमिओने आत्महत्त्या केली या त्याच्या कृत्यामागे त्याचे शुद्ध प्रेम नाही तर त्याच्या स्वभावातील उतावळेपणा आहे. रोमिओच्या प्रकृतीत कवीने जो आवेग कल्पिला आहे त्यातून रतिभर आवेग कमी केला की शेवट विसंगत होईल. या नाटकात सर्व खेळ

अत्यंतावेगी मनोवृत्तीचाच आहे व त्या आवेगाचा विषय युवायुवतीप्रेम हा आहे. या नाटकाचा विषय शुद्ध प्रेम नसून प्रेमावेग हा आहे म्हणजेच रजोगुणात्मक अशुद्ध प्रेमाची या नाटकात नुसती धुमाळी माजलेली आह.

नाटकाच्या कथानकातील विविध प्रसंगांतून रोमिओचा अधीरा, उतावळा स्वभाव, सर्वच बाबतीतील तीव्र मनोवृत्ती यांची सोदाहरण चर्चा श्री. बापट यांनी या लेखात केली आहे त्याचप्रमाणे प्रारब्ध (Destiny) हाही एक घटक रोमिओच्या आयुष्यातील घडामोडीत सतत कसा कार्यरत आहे तेही सोदाहरण दाखविले आहे. रोमिओला पडणारी स्वप्ने ही पुढील घटनांची सूचक आहेत. त्याला स्वप्ने पडतात. स्वप्नांवर त्याचा विश्वास आहे आणि त्यामुळे त्याच्या वागण्याला विशिष्ट वळण मिळते. रोमिओच्या या व्यक्तिविशेषामुळे नाटकाचा आदि, मध्य व अंत जसे दाखविले आहेत तसे दाखविण्यास मदत झाली आहे असे श्री. बापट यांचे प्रतिपादन आहे.

रोमिओला ज्युलिएटबद्दल प्रेम वाटले त्यामागे त्याचे एकूण व्यक्तिमत्त्व कसे होते याची चर्चा जशी या लेखात आली आहे तशीच ज्युलिएटला रोमिओबद्दल प्रेम वाटले ते का ? व कसे ? याचाही विचार येथे केला आहे. ज्युलिएटच्या सौंदर्यावर रोमिओ लुब्ध झाला. तिच्या प्रेमात पडला पण Love at first sight हा प्रकार ज्युलिएटच्या बाबतीत संभवनीय नव्हता. रोमिओचा चेहरा झाकलेला होता. रोमिओच्या रूपागुणांचे वर्णन कोणाच्या तोंडून ऐकल्यामुळे त्याच्याबद्दल प्रेम वाटले असाही भाग नव्हता. आपल्याशी जो तरुण बोलत आहे तो कोण हे तिला माहीत नव्हते. त्याचे चार शब्द कानावर पडल्याबरोबर तिची त्याच्यावर दृढ प्रीती बसते. तो पुरुष कोण आहे याचा तपास कर असे ती दाईला सांगते. तो तरुण आपल्या वैरी घराण्यातील आहे असे दाईकडून कळल्यावर ती म्हणते –

> ‘‘My only love spring from my only hate!
> Too early seen unknown, and known too late!
> Prodigious birth of love it is to me
> That I must love a loathed enemy".

श्री. बापट म्हणतात, ज्युलिएटच्या ठिकाणी हा प्रेमोग्दम दैवी सूत्रानेच घडून आला असे म्हटले पाहिजे. कारण ही गोष्ट अघटितच आहे. हा प्रेमोग्दम इतर रीतीने उत्पन्न झालेला

शेक्सपीअरला दाखविता आला असता पण त्याने तसे केलेले नाही. ही चूक शेक्सपीअरसारख्या कुशल लेखकाच्या लक्षात न येणे अशक्य आहे. जे आहे ते त्याच्या दृष्टीने योग्यच असले पाहिजे. म्हणून ज्युलिएटची प्रेमासंबंधी कल्पना काय होती ते पाहून या घटनेचा अर्थ लावता येईल.

नाटकाच्या काळी ज्युलिएटचे वय चौदा वर्षांचे दाखविलेले आहे. रोमिओवर प्रेम बसण्या अगोदर तिचे मन दुसऱ्या कोणाकडे वळेलेले नव्हते. प्रेमासंबंधी काही कल्पना मनाशी निश्चित असण्या एवढे तिचे वय नाही. पण प्रेम या विषयासंबंधी तिच्या मनात काहीच कल्पना नव्हत्या हे म्हणणे बरोबर ठरणार नाही असे तिच्या व तिच्या आईच्या पॅरिसबद्दलच्या संभाषणाच्या आधारे श्री. बापट यांनी दाखविले आहे. त्यांच्या मते अमुक पुरुष आपले प्रीतिस्थान होण्यास योग्य किंवा अयोग्य हे ठरविण्याची शक्ती डोळ्यांच्या ठिकाणी नाही असा तिचा समज होता. मग ती शक्ती कशात आहेङ्ग? प्रीतीचे स्थान त्या जगन्नियंत्याच्या ठरविण्यावर व त्याच्या प्रेरणेवर राहणार असाच तिचा समज असला पाहिजे. शेक्सपीअरची नायिका ईश्वरी प्रेरणा मानणारी आहे तर नायक स्वत:च्या ज्ञानेंद्रियांवर भरवसा असणारा आहे. ज्युलिएटला रोमिओविषयी जे प्रेम वाटले ते केवळ प्रेरणेने वाटले असे मत श्री. बापट यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, अन्यथा, शेक्सपीअरच्या कलाकृतीतील तो दोष मानावा लागेल. रोमिओच्या प्रेमात अस्थिरता होती पण प्रेमाची स्थिरता हा ज्यूलिएटचा विशेष होता. शेक्सपीअरने तो वारंवार व्यक्त केला आहे. त्याचे नाव विचारून ये असे दाईस सांगून ती म्हणते

‘ If he be married
My grave is like to be my wedding bed ’

रोमिओ रजनीनायकाची शपथ घेणार इतक्यात त्याला थांबवून ती म्हणते

‘ O! Swear not by the moon, the inconsistant moon
That monthly changes in her circled orb,
Lest that thy love prove likewise variable '

रोमिओला तिने अखेरचा प्रश्न विचारला त्यातील तिचे शेवटचे शब्द – cease the suit and leave me to my grief . असे आहेत.

ज्याला मनाने वरिले तो जर प्राप्त झाला नाही तर दुसऱ्या कोणाला वरण्याची आपणास मोकळीक नाही असा तिचा समज होता. जिथे प्रेम बसले तिथे जर त्याचे साफल्य झाले नाही तर त्याला या जगात दुसरे स्थान असणे शक्य नाही ही प्रेमासंबंधीची तिची कल्पना होती.

To live an unstained wife to my sweet love. हा तिचा निश्चय तिने पार पाडला. रोमिओप्रमाणेच ज्युलिएटच्या व्यक्तित्वातही आवेग आहे परंतु त्याचे स्वरूप वेगळे आहे. तिच्यावर संकटांमागून संकटे आली पण त्यातून पार पडण्यासाठी ती जे जे पाऊल टाकते त्याच्या मुळाशी –

My husband is on earth my faith is in heaven!

हा निश्चय आहे. प्रेम, क्रोध, शोक अशा वेगवेगळ्या भावना ती व्यक्त करते त्यावेळीही विचार तिला सोडून जात नाही.

ज्युलिएटच्या व्यक्तिरेखेचा सविस्तर विचार मांडल्यावर श्री. बापट यांनी या नाटकाचा केंद्रबिंदू सांगितला आहे तो असा –

‘ ज्याच्या१ ठिकाणी स्वरूप व प्रेम याची समव्याप्ती होती, ज्याच्या प्रेमात अस्थिरता होती, व ज्याच्या शीलात आवेग इतका होता की, देहभान मुळीच नाहीसे होत होते असा रोमिओ व जिच्या ठिकाणी प्रेम व ईश्वरप्रेरणा यांची सांगड होती, जिच्या प्रेमात अस्थिरतेचा लेश देखील नव्हता व जिचा विचार आवेगाच्या वेळीही तिला सोडीत नव्हता अशी ज्युलिएट यांच्या परस्परांवरील स्त्रीपुरुषप्रेमाची हे नाटक ही कहाणी आहे. ’

श्री. बापट यांनी, अशारीतीने, रोमिओ आणि ज्युलिएट या नाटकातील स्त्रीपुरुषप्रेम या विषयाचा विशिष्ट पैलू लक्षात घेऊन आपले विचार व्यक्त केले आहेत. अशा तऱ्हेचे विवेचन मराठीत यापूर्वी कोणी केलेले नव्हते यादृष्टीने या लेखाचे महत्त्व निश्चितच आहे.

शेक्सपीअरने आपल्याकडील विद्वानांवर इतकी मोहिनी का घातलीङ्? त्याच्या कलाकृतींची वैशिष्ट्ये कोणतीङ्? या प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे शोधण्याचा एक प्रयत्न म्हणजेच रंगभूमी नियतकालिकातील शेक्सपीअर वरील लेख होत.

श्री. बापट यांनी रोमिओ आणि ज्युलिएट या नाटकाच्या शोकरसपूर्ण शेवटाबाबतही विवेचन केले आहे. हा दु:खद शेवट न रुचणाऱ्या प्रेक्षकांची, वाचकांची अभिरुची लक्षात घेऊन काही भाषांतरकारांनी हे नाटक सुखपर्यवसायी करून दाखविल्याचे श्री. बापट यांनी नमूद केले आहे. असे वाचक-प्रेक्षक म्हणजे संस्कृतपरंपरेचे अभिमानी वाचक-प्रेक्षक असले पाहिजेत हे उघड आहे. या रसिकांसाठी शेक्सपीअरच्या नाटकाचा शेवट बदलणे ही गोष्ट काही योग्य म्हणता येणार नाही. मूळ नाटकाचा संपूर्ण परिणाम त्यामुळे उणावणार पण तिकडे दुर्लक्ष करून ही तडजोड केली गेली ही त्या काळाची मर्यादा मानली पाहिजे. नाटकाचा शेवट हा आपल्याकडे नेहमीच चर्चेचा विषय ठरला आहे. श्री. बापट यांनी आपल्या ‘ नाटकविषयक व्यापक विचार ’ या निबंधात याबाबत काही विचार मांडलेले आहेत.

रोमिओ आणि ज्यूलिएट या नाटकाच्या अखेरीबाबत शेक्सपीअरने सुरुवातीच्या झीश्रिर्सिीश मध्येच कल्पना दिली आहे याकडे श्री. बापट यांनी लक्ष वेधले आहे. दोन घराण्यातील हाडवैर अशा शेवटाखेरीज मिटणे अशक्य. हे मनात योजूनच शेक्सपीअरने शेवट दु:खद केला आहे. तेव्हा याबाबत वादाला जागा नाही. नायक-नायिका दोघेही Star Crossed असल्यावर असा शेवट अपरिहार्य आहे. कोणत्याही गोष्टीचे टोक गाठले गेले की शेवट दु:खी, अविचारी कृत्याचा शेवट दु:खी, या दृष्टीने हा शेवट योग्यच आहे, पण दुसऱ्या दृष्टीने विचार करून शेवट गोड करणे शक्य आहे असे श्री. बापट यांनी सुचविले आहे. चुकीच्या समजुतीबद्दल पश्चात्ताप होतो, त्या पश्चात्तापातून इष्ट हेतू साध्य करून घेता येतो व तो साध्य झाल्यावर कटु फळ आले नाही अशी कथा करून नाटकाचा शेवट गोड करता येतो. या पद्धतीने याही नाटकाचा शेवट गोड करता येईल असे प्रतिपादन श्री. बापट यांनी केले आहे. पण ते फारच त्रोटक आणि क्लिष्ट रीतीने केले आहे असे असले तरी स्वतंत्र बुद्धीने शेक्सपीरच्या एकेका नाटकाला सामोरे जाण्याची जी प्रक्रिया या काळात सुरू झाली तिला रंगभूमीकारांनी मानाचे स्थान दिले म्हणून या दोन्ही घटना मराठी नाट्यसमीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.